# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :- ५४/२०२३                                        दिनांक :- १५/०२/२०२३

## दुचाकी चोरी करणा-या आंतरराज्यीय टोळीला पकडुन १३ गुन्हयांची उकल.
## गुन्हे शाखा, कक्ष-२ वसई युनिटची कामगिरी.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे हद्दिमध्ये मोटार सायकल चोरीच्या गुन्हयांच्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढ होत असल्याने सदर गुन्हयांना आळा घालणेबाबत व दाखल गुन्हयांची उकल करण्याबाबत वरीष्ठ पोलीस अधिका-यांनी सूचना दिल्या होत्या.

त्या अनुषंगाने मोटार सायकल चोरी झालेल्या ठिकाणांना प्रत्यक्ष भेट देवून घटनास्थळावरील सी.सी.टी.व्ही. फुटेजचे परीक्षण गुन्हे शाख, कक्ष २ वसई यांचे मार्फतीने करण्यात येत होते. सदर तांत्रिक विश्लेषण व गोपनीय बातमीदाराकडून मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे तुळींज पोलीस ठाणे हद्दीतील मोरेगाव परीसरामधुन संशयित आरोपी नामे १) आनंद कलमेश ओझा वय २५ वर्ष रा. बी/४, स्मृती चाळ, मोरेगाव, शिवमंदिर जवळ, नालासोपारा पुर्व व २) एक विधीसंघर्षग्रस्त बालक वय १६ वर्ष धंदा - बेकार, नालासोपारा पुर्व यांना ताब्यात घेवून त्यांचेकडे चौकशी केली असता त्यांनी विरार, वालीव, आचोळे, माणिकपुर, काशिमिरा, दहीसर पोलीस ठाणे हद्दीतुन १२ मोटार सायकली चोरी केल्याचे निष्पन्न झाले. त्यांच्याकडे अधिक सखोल विचारपूस करता त्यांनी त्या मोटार सायकली सोनगढ, राज्य-गुजरात या ठिकाणी विक्री करीत असल्याबाबतची माहीती दिली तसेच त्यांना सदर गुन्हयात आरोपी १) धिरज जटाशंकर ओझा, वय २१ वर्ष, रा. शिवाजीनगर, सोनगड, जि.तापी, राज्य गुजरात, २) कौशिक देविदास मराठे, वय २० वर्ष रा. शिवाजीनगर, सोनगड, जि. तापी, राज्य गुजरात हे मदत करीत असल्याचे सांगितल्याने त्यांना सोनगढ, राज्य गुजरात येथून ताब्यात घेण्यात आले आहे. नमूद आरोपीतांकडून एकुण ७,५५,०००/- रुपये किंमतीच्या १२ मोटार सायकली जप्त करण्यात आल्या आहेत

### :- उघडकीस आलेले गुन्हे :-

| अक्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि व कलम |
|---|---|---|
| १. | आचोळे | ०२/२०२३, भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे |
| २. | आचोळे | १५/२०२३, भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे |
| ३. | आचोळे | २१/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे |
| ४. | आचोळे | ७९/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे |
| ५. | विरार | ७८/२०२३, भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे |
| ६. | विरार | १४९/२०२३, भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे |
| ७. | विरार | १२२२/२०२२, भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे |
| ८. | माणिकपुर | २३/२०२३, भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे |
| ९. | काशिमिरा | ५३/२०२३, भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे |
| १०. | वालीव | १३११/२०२२, भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे |
| ११. | वालीव | १३६२/२०२२, भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे |
| १२. | दहीसर | १६२/२०२३, भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे |
| १३. | कासा | ०१/२०२३, भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे |

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, कक्ष २ वसई युनीटचे पोलीस निरीक्षक शाहुराज रणवरे, स.पो.निरी. सुहास कांबळे, सहा.फौज. रमेश भोसले, संजय नवले, पो.हवा. ०३०५२ चंदन मोरे, सचिन पाटील, जगदीश गोवारी, रमेश आलदर, सुधीर नरळे, पो.ना.प्रशांतकुमार ठाकुर, पो.अंम. अमोल कोरे यांनी केलेली आहे.

**--------00000-------**